## -: चौकशी अहवाल :-

विषय :- रोहयो रस्ता बांधकामात २० लाखाचा भ्रष्टाचार.

संदर्भ :- १) दैनीक लोकमत दिनांक १०.५.२००४ ची कात्रण.

२) मा. आयुक्ताचे पत्र क्र. PA/P-C/WS २/२००४, दिनांक १२.५.२००४

कामाचे नांव :- १) कान्होलीबारा माथनी रस्त्याचे बांधकाम भाग १
लांबी ०/० ते ३/००

२) कान्होलीबारा ते माथनी रस्त्याचे बांधकाम भाग २
लांबी ३/०० ते ४/६५०

३) माथनी कोकर्डी रस्त्याचे बांधकाम भाग ३
लांबी ०/० ते १/९२०

उपरोक्त विषयानुसार वरील तिन कामाची तक्रार दैनीक लोकमत मध्ये आली असून वरील कामाची चौकशी करण्याचे आदेश दक्षता पथक यांना प्राप्त झाले. त्यानुसार वरील कामाचे अभिलेखची मागणी संबंधीत यंत्रणे कडून करण्यात आली. वरील कामाचे हजेरीपट मोजमाप पुस्तक अंदाजपत्रक या कार्यालयास मिळाले असून अजुन काही अभिलेख अप्राप्त आहे.

वरील कामाचे दिनांक २०.५.२००४ रोजी निरिक्षण करण्यात आलेले असून त्या दिवसी काही मजुराचे बयान सुध्दा घेण्यात आले. तसेच दिनांक ९.७.२००४ रोजी संबंधीत खदानीचे राज्य विभागाचे तलाठी, मंडल अधिकारी, सरपंच इत्यादींचे बयान घेण्यात आले. तसेच १०.७.२००४ , १२.७.२००४ व २८.७.२००४ ला घेण्यात आलेले बयानाची प्रत सुध्दा सोबत जोडण्यात येत आहे.

सदर कामे सन २००० मध्ये सुरु करण्यात आले असून सन २००१ व २००२ मध्ये पुर्ण करण्यात आले. वरील तीन कामात संक्षीप्त विवरण खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

१) कान्होलीबारा माथनी रस्त्याचे बांधकाम भाग १ लांबी ०/० ते ३/०० सदर कामाचे अंदाजपत्रक कार्यकारी अभियंता मार्ग प्रकल्प विभाग, नागपूर यांनी तयार केले असून हया कामाला कार्यकारी अभियंता सा.बां. वि.क्र.३ यांनी तांत्रीक मंजूरी क्र. १७/T/EE ३/१९९९-२०००, दिनांक ६.७.९९ अन्वये तांत्रीक मान्यता प्रदान केली आहे.

सदर कामाची अंदाजित किंमत रु. १४,३६,९१०/- असून त्यात अकुशल - कुशल भाग ९,२२,६५७/- : ५,१४,२५३/- म्हणजे ६४.२१% : ३५.७९% आहे.

पुर्णत्वाच्या दाखल्या प्रमाणे सदर काम दिनांक ११.६.२००० रोजी सुरु झाले असून दिनांक ५.७.२००१ रोजी पुर्ण करण्यात आले व सदर कामाचा अकुशल खर्च रु. ९,२७,६२८/- वे कुशल खर्च रु. ३,७२,४७७/- असून हया कामावर झालेला एकुण खर्च रु. १३,००,११५/- इतका आहे.

२) कान्होलीबारा ते माथनी रस्त्याचे बांधकाम भाग-२ (लांबी ३/०० ते ४/६५० कि.मी.) सदर कामाचे अंदाजपत्रक कार्यकारी अभियंता मार्ग प्रकल्प विभाग, नागपूर यांनी तयार केले

..२..

असून ह्या कामाला तांत्रीक मान्यता कार्यकारी अभियंता सा. बां. वि.क्र.३ नागपूर यांनी प्रदान केली आहेत. तांत्रीक मान्यतेचा क्र. १८/EE/१९९९-२००० दिनांक ६.७.९९ आहे. सदर कामाची अंदाजित किंमत ९,३०,४१०/- असुन त्यात अकुशल : कुशल भाग रु.५,७७,००९/- : रु. ३,५३,४०१/- म्हणजे ६२.०१% : ३७.९९% आहे.

पुर्णत्वाचे दाखल्या प्रमाणे सदर काम दिनांक १.६.२००० रोजी सुरु करण्यात आले असून दिनांक ५.७.२००१ रोजी पुंर्ण करण्यात आले. सदर कामाच्या प्रत्यक्ष अकुशल खर्च रु.५,७१,१४४/- असून कुशल खर्च रु.२,४७,१५२/- असे एकुण रु. ८,१८,२९६/- आहे.

३) माथनी ते कोकर्डी रस्त्याचे बांधकाम भाग ३ (लांबी ०/० ते १/९२०) सदर कामाचे अंदापजपत्रक कार्यकारी अभियंता मार्ग प्रकल्प विभाग, नागपूर यांनी तयार केले असून ह्या कामाला तांत्रीक मान्यता कार्यकारी अभियंता सा.बां. वि.क्र.३ नागपूर यांनी प्रदान केली आहेत. तांत्रीक मान्यतेचा क्र. १९/टी/ईई/१९९९-२००० दिनांक ६.७.९९ आहे. सदर कामाची अंदाज़ित किंमत रु. ११,३९,२२०/- असून त्यात अकुशल : कुशल भाग रु. ६,५९,३८१/-: रु. ४,७९,९३९/- म्हणजे ५७.८७% : ४२.१३ %

पुर्णत्वाचे दाखल्या प्रमाणे सदर काम दिनांक १४.६.२००० रोजी सुरु करण्यात आले असून दिनांक ३१.३.२००२ रोजी पुर्ण करण्यात आले.

वरील तिन्ही काम जिल्हाधिकारी, नागपूर यांनी त्यांचे पत्र क्र. क.अ/उपअभि/का २३/कावि२२०००/ दि.९.५.२००० आन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. सदरील कामे उपवनसंरक्षक वन विभाग, नागपूर यांचे अंतर्गत वनपरिक्षेत्र अधिकारी, हिंगणा परिक्षेत्र याच्या कडून राबविण्यात आले. (वरील तिनही कामामध्ये यमातीकाम सह ३.३० मीटर रुंदीचे २० से.मी. जाडीचे (लुज) ८० मी.मी. आकाराचे खडीची एक थर तसेच ३ मीटर रुंदीचे १० सेंमी (लूज) जाडीची एक थर प्रस्तावीत होती. त्या प्रमाणे एकुण २२.५. सें.मी. (दाबलेली) खडी करणाची तरतुद होती. तसेच वरील सर्व कामामध्ये १५ सें.मी. दाबलेली मुरुम थराची तरतुद होती. वरील तिन्ही कामा मध्ये ८०व ४० मी.मी. आकार खडी, मुरुम, रेतीची वाहतुक अनुक्रमे गोडेघाट अंतर ११ कि.मी. औसत, वारंगा ९.५० कि.मी. औसत, वेणानदी २४ कि.मी. औसत इतके अंतरा वरुन खडी मुरुम रेतीची वाहतुक अंदाजपत्रकाप्रमाणे प्रस्तावीत होती.)

तक्रारीची छाननी केली असता त्यात प्रामुख्याने खालील मुद्दे आढळतात.

१) वरील रस्त्याचे कामात दगड, गिट्टी, मुरुम व माती आणि रेतीचा उपयोग न करता गोल दगड व रस्त्याचे बाजुला असलेल्या शेतातुन माती मिश्रीत मुरुमाच्या उपयोग करणे. तसेच बहेघाट खान येथुन गिट्टी न आणता बाजुच्या शेतातुन गोल दगडाचा वापर करणे व सदर काम निकृष्ट दर्जेचा असणे.

२) स्थानीक मजुरा कडून काम न करता मध्य प्रदेशातील मजुरा कडून काम करुन घेणं.

३) मजुरांना कमी पगार देणे व त्यामुळे एका मजुरानी आत्महत्या करणे.

४) वरील कामामध्ये २० लाखाचा भ्रष्टाचार करणे.

(5)



वरील कामाची चौकशी केली असता व प्राप्त दस्ताऐवज व मजुराचे व शासकीय कर्मचाऱ्यांचे बयाना वरुन खालील प्रमाणे मुद्दे निहाय वस्तुस्थिती आढळ्तात.

मुद्दा क्रमांक १ :- वरील तिनही कामाचे अंदाजपत्रकामध्ये खडी (८० मी.मी. ४० मी.मी.) मुरुम व रेती अनुक्रमे घोडेघाट खदान, वारंगा खदान व वेणा नदी वरुन आणने प्रस्तावीत होते.

सदर साहित्याची वाहतुकीसाठी यंत्रणेचे कागदपत्रे अनुसार (उपवनसंरक्षक वन विभाग, नागपूर यांचे पत्र क्र. रोहयो/१९००/दिनांक ४.७.२००० अनुसार मॉं. गायत्री कन्स्ट्रक्शन नागपूर यांना देण्यात आले होते. परंतु दिनांक ९.७.२००४ रोजी कान्होलीबारा येथे, कान्होलीबारा राजस्व मंडल अंतर्गत घोडेघाट चे तलाठी श्री एम.पी. मडावी चे बयानानुसार घोडेघाट खदानीतून वरील कामासाठी एकही ब्रास खडी फोडण्यात व उचल करण्यात आली नाही. तसेच त्या करीता त्यांना कोणतेही आदेश व शासकीय जागेतून खडी काढण्यासाठी तहसिलदार हिंगणा कार्यालयात रायल्टी भरण्यात आलेली नाही.

दिनांक ९.७.२००४ रोजी कान्होलीबारा येथे कान्होलीबारा राजस्व मंडळ अंतर्गत वारंगाचे तलाठी श्री. सी.टी. नाईक चे बयानानुसार वारंगा मुरुम खदानातून वरील कामासाठी एकही ब्रास मुरुम उचल करण्यात आले नाही. तसेच त्याकरिता त्याना कोणतेही आदेश व शासकीय जागेतून मुरुम काढण्याकरिता तहसीलदार हिंगणा कार्यालयात रायल्टी भरण्यात आलेली नाही.

दिनांक ९.७.२००४ रोजी माथनी येथे शेतकरी ज्ञानेश्वर नामदेव कुकडकर व कवडुजी पुनबाजी दुधबडे यांनी दिलेले बयानानुसार त्याचे शेत वरील रस्त्याचे कामाचे बाजुला असून त्याचे शेतातुन दगड उचल करण्यात आले व त्याकरिता त्यांना कोणतेही रक्कम प्रदान करण्यात आली नाही. तसेच कवडुजी पुनबाजी दुधबडे यांचे बयाना वरुन त्यांचे शेतातुन दगड त्यांना न विचारता न सांगता उचलण्यात आले. तसेच अरुण नासरुजी बुधबावरे यांचे बयानानुसार शेताची साफसफाई होईल या दृष्टीकोणातून आपले शेतातून दगड उचलण्याची परवानगी दिली व त्यासाठी त्यांना कोणतेही रक्कम मिळालेली नाही. त्यांचे बयानावरुन असे स्पष्ट होते की, त्यांचे शेतातून उचललेली खडी जसीच्या तशी रस्त्यावर टाकण्यात आली.

अनिल कृष्णाजी बुधबावरे यांचे बयाना नुसार सुध्दा वरील बाब स्पष्ट होते.

दिनांक ९.७.२००४ रोजी श्री. के.एम. खोडे, तलाठी , माथनी यांनी दिलेले बयानानुसार वरील रस्त्यांचे खडीकरणाचे कामामध्ये जास्तीत जास्त गोल दगडाचा वापर करण्यात आला असून हया कामासाठी खडी व मुरुम बाजुचे शेतातून घेण्यात आले. हया प्रमाणे कान्होलीबारा कोकर्डी माथनी येथील गांवकऱ्यांचे सोबत जोडलेले अनेक बयानानुसार सदर रस्त्याचे कामाकरिता वापरण्यात आलेली खडी व मुरुम रस्त्याचे आजुबाजुचे शेतातून घेण्यात आली व वापरण्यात आलेली खडी प्रमाणीत आकाराची नोव्हती व हया कामात रेतीचा उपयोग झाला नाही.

हया कार्यालयानी वरील सर्व कामासाठी लागणारी खडी मुरुम व रेतीचा वाहतुकीसाठी यंत्रणे कडून वापरण्यात आलेले दस्ताऐवज उदा० निवीदा, करारनामा, मोजमाप पुस्तक इत्यादींची मागणी यंत्रणे कडून केली असून अजुन हया कार्यालयात अप्राप्त आहे.

दिनांक २०.५.२००४ व दिनांक ९.७.२००४ रोजी निरीक्षणाच्या वेळी सदर रस्ता खराब असून बऱ्याच ठिकाणी रस्ता उखडलेला होता. तसेच सदर रस्ता बरेच ठिकाणी वाहना करीता व पैदल चालण्याकरिता पुर्णता अयोग्य होता. हया रस्त्यावर उखडलेली खडी वरुन असेही स्पष्ट होते की, वापरण्यात आलेली खडी योग्य आकार व ग्रेडेशनची नव्हती व हया रस्त्यावर रस्त्याचे काम करताना Watering and compaction योग्य प्रकारे करण्यात आले नाही. तसेच सदर रस्त्यांवर मोजमाप पुस्तकांप्रमाणे रस्त्याचे आजुबाजुला माती कामा करिता बारोपीट दिसले नाही व हया रस्त्यांवर सुध्दा मोजमाप पुस्तक प्रमाणे माती काम तेवढे दिसले नाही. सदर बाब श्री. के.एस. खोडे, तलाठी, माथनी यांचे बयानावरुन स्पष्ट होते. मोजमाप पुस्तक क्र. १ पान १ ते ८ मध्ये दाखविण्यात आलेले दोन ते चार मीटर खोलीचे एक ही बारोपीट दिसले नाही.

वरील सर्व तिनही कामामध्ये मातिकाम सुरु करण्याचे अगोदर व मातीकाम पुर्ण झाल्यानंतर फील्ड बुक मध्ये रोहयो सार ग्रंथ प्रमाणे लेवल घेणे आवश्यक असते व काठछेद पध्दती ने झालेले मातीकाम बारोपीट पध्दतीने केलेले कामाची तुलना करावयाची होती. संबंधीत उपवनसंरक्षक यांचे कडून फिल्ड बुकची मागणी केली असता हया कामासाठी फिल्डबुक मध्ये लेवल घेण्यात आले नाही असे त्यांनी लिहून दिलेले आहे. तसेच खडी मुरुम रेतीचे RMR ची मागणी केली असता ते अजुन हया कार्यालयात अप्राप्त आहे.

हया कार्यालयात प्राप्त हाजेरीपट मध्ये काही हाजेरी पटात भाग ३ भरण्यात आलेला नाही व काही भरलेला हाजेरीपटा मध्ये खडी फोडणे व मुरुमाची वाहतुक दाखविण्यात आलेली आहे. परंतु खडी फोडण्याचे काम कोणते ठिकाणी झालेले आहे व सदर खडीची व मुरुमाची वाहतुक कोठुन कुठे करण्यात आली त्यांचा काहीही उल्लेख हाजेरीपटात व मोजमाप पुस्तकात करण्यात आलेला नाही. तसेच रेतीची वाहतुकी सुध्दा मोजमाप पुस्तका प्रमाणे कोठून कुठे करण्यात आली हयाचा सुध्दा उल्लेख करण्यात आलेला नाही.

वरील बाबी वरुण वरील सर्व कामांमध्ये अंदाज पत्रकात दर्शविलेली खदानी वरुन खडी व मुरुमाची वाहतुकी न करता रस्त्याचे आजुबाजुचे शेतातुन योग्य गुणवत्ता नसलेली दगडे व मुरुमाचा वापर झालेला आहे आणि काम करताना सुध्दा कामाची गुणवत्ता प्रमाणे कार्य न झाल्याने सदर रस्ता खराब स्थितीत आहे व तक्रारीचा या बाब मध्ये तथ्य दिसते.

मुद्दा क्रमांक २ :- प्राप्त णालेला जवळ पास सर्व मजुरांचे व शासकीय कर्मचारीचे बयाना प्रमाणे सदर कामावर अधिकांश मजूर मध्यप्रदेश राज्याचे होते. सदर बाबची पुष्टी श्री. के.एस. खोडे, तलाठी, माथनी व सरपंच ग्राम पंचायत डेगमा सदस्य ग्राम पंचायत डेगमा व इतर गावकरीने सुध्दा केलेली आहे. सदर कामाचे काही हाजेरीपटात केसला, छापरा

..५..

या गावांचे मजूर दर्शविण्यात आलेले आहे. श्री. के.एम. खांडे, तलाठी माथनी यांचे बयाना प्रमाणे सदर गांवे हिंगणा तालुक्यातील नाही. वनपरिक्षेत्राधिकारी, हिंगणा यांनी तहसिलदार, हिंगणा यांचेकडे सादर केलेल्या पत्र क्र. हि/आर/रोहयो/१३३/२०००-०१ दिनांक १२.१.२००१ प्रमाणे त्यांनी तलाठी/पटवारी यांना माहिती न देता स्वतः कामावर हजर झालेल्या मजुरांची यादी कळविलेली आहे. तहसिलदार हिंगणा हयांचे पत्र क्र. संकीर्ण/तह.हि/कावि/६३४/२००४, दिनांक २६.७.२००४ अन्वये तहसिलदार कडून सदर कामासाठी राज्याचे बाहारचे मजुरांना नमुना ७ देण्यात आलेला आहे असे दिसून येत. हे नियमबाहय आहे. वरील बाबी वरुन सदर कामामध्ये राज्य बाहरील मजूर कामावर होते हया बाबीमध्ये तथ्य आहे.

<u>मुद्दा क्रमांक ३</u> :- वरील सर्व कामात काम करणारे कान्होलीबारा माथनी व कोकर्डी चे काही मजुराचे या कार्यालयास प्राप्त झालेल्या प्रत्यक्ष बयाना वरुन त्यांना प्रत्यक्ष मिळालेली मजूरी व हजेरीपटावर काढण्यात आलेली मजूरीचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला आहे. सदर तुलनात्मक तक्ता सोबत जोडण्यात येत आहे. सदर तुलनात्मक तक्त्या प्रमाणे सुमारे ३० मजुरांना हजेरीपटाप्रमाणे अंदाजे रु. ५०/- ते रु. ११६/- प्रमाणे रु. २८,४६३/- मजूरी देण्यात आलेली आहे. परंतु मजुराचे प्रत्यक्ष बयाना प्रमाणे रु. ४०/- ते ५०/- या दराने रु. १५,०८७/- ऐवढी मजूरी प्रत्यक्षात देण्यात आलेली आहे. सदर मजूरीची तफावतची रक्कम रु. १३,३७६/- असून अंदाजे तफावत ची टक्केवारी ४७% आहे.

कान्होलीबारा येथे बयान घेण्याच्या वेळी मजूरांना वेतन न मिळाल्याने एका मध्यप्रदेशाच्या मजुराने आत्महत्या केली आहे असेही सांगण्यात आले. परंतु हया बाबत कोणतेही बयान किंवा दस्ताऐवज प्राप्त झाले नाही.

तसेच हजेरीपट क्र. ५०३७८, ५०३७९,५०३८०,५०३८१,५०३८२,५०३८३,५०३८४ कालावधी दिनांक ३०.४.२००१ ते १२.५.२००१ हया प्रामुख्याने वाहतुकीचे हजेरीपटामध्ये कोणतेही सरपंच किंवा पोलीस पाटील यांची स्वाक्षरी नाही. तसेच हजेरीपट क्र. ५०३६८,५०३६९,५०३७०,५०३७१,५०३७२,५०३७३,५०३७४ कालावधी दिनांक १.४.२००१ ते १५.४.२००१ चे मार्ती कामाचे व खडी फोडण्याचे व मुरुम वाहतुकीचे हजेरीपटामध्ये कोणतेही सरपंच किंवा पोलीस पाटीलाची स्वाक्षरी नाही. या कार्यालयास प्राप्त हजेरी पटानुसार जवळपास एकुण ९.१९ लक्षचे हजेरी पटावर कोणत्याही साक्षीदारांची स्वाक्षरी नाही. तसेच बऱ्याच हजेरीपटामध्ये आठवडी सुट्टी देण्यात आलेली नाही. व काही हजेरी पटाच्या भाग ३ भरण्यात आलेला नाही.

तुलनात्मक तक्त्या प्रमाणे काही मजुराची हजेरीपटामध्ये असलेली सही संबंधीत मजुराची नाही व काही मजुरांना सही करता येते पण हजेरीपटावर त्याचे नांवा समोर आंगठा लावण्यात आलेला आहे. त्यामुळे वरील सर्व कामामध्ये मजूरांना हजेरीपटा प्रमाणे कमी दराने मजुरी प्रदान करण्यात आलेली आहे हया मध्ये तथ्य दिसून येते.

..६..

**मुद्दा क्रमांक ४ :-** हया कार्यालयात प्राप्त पुर्णत्वांच्या दाखल्या प्रमाणे वरील तीन कामामध्ये एकुण रु. २१,३६,९५३/- अकुशल बाबी करिता व रु. ९,६८,६७८/- कुशल खर्च असे एकुण रु. ३१,०५,६३१/- इतका खर्च झालेला आहे. या कार्यालयानी काही मजूरांचे व गावकऱ्यांचे घेण्यात आलेले बयाणा प्रमाणे या कामावर ८ ते ९ इंच मातीकाम झालेले आहे, आणि रस्त्याच्या आजूबाजू कडून व शेतातून मुरुम घेण्यात आलेली आहे. तसेच या बयाणा प्रमाणे या कामासाठी वापरण्यात आलेले दगड शेतातून व नाल्या वरुन सरासरी २.५ कि.मी. अंतरावरुन आणले. तसेच सदर कामावर रेतीचा उपयोग झाला नाही असेही बयान प्राप्त झालेले आहे. (सदर बयानाची प्रत सोबत जोडली आहे.) या कामांवर प्राप्त बयाना प्रमाणंव प्राप्त दस्तावेज प्रमाणे वरिल तिन्ही कामामध्ये मातीकामचे परिमाण, मातीकामची दबाई, खडी फोडणे, खडी वाहतूक, मुरुम वाहतूक व रेतीचा पुरवठा व वाहतूकमध्ये अंदाजपत्रका प्रमाणे केलेल्या खर्चामध्ये तफावत दिसून येते. सोबत जोडलेल्या प्रपत्राप्रमाणे सदर तफावतची रक्कम अंदाजे रु. १६.७२ लक्ष अशी वाटते. या सर्व बाबींवर सुमारे १५ ते २० लाखाचा भ्रष्टाचार झाला असावा असे वाटते. उपरोक्त बाबी वरुन तिन्ही कामात भ्रष्टाचार झालेला आहे असे दिसून येते.

सदर अनियमितते करीता वन परिक्षेत्र अधिकारी (विकास), वन परिक्षेत्र, हिंगणा येथील के.एस. डोंगरे हे प्रामुख्याने दोषी आढळतात. तसेच हया कामांवर कार्यरत असलेले यु.से. राऊत, क्षेत्र सहाय्यक, हिंगणा परिक्षेत्र विकास हे सुध्दा प्रामुख्याने दोषी आढळतात. तसेच नियंत्रण अधिकारी म्हणून संबंधीत सहाय्यक उपवन संरक्षक व उपवन संरक्षक हे ही दोषी आढळल्याचे दिसून येते. तसेच सदर कामावर खडी व मुरुमाची अनियमीत वाहतुकीसाठी व त्यांच्या कडून जारी करण्यात आलेले नमुना ७ करीता तहसिलदार हिंगणा कडून स्पष्टीकरण मागविणे आवश्यक आहे.

सबब सदर चौकशी अहवाल माहिती व पुढील आदेशार्थ सादर.

Osd/G/S.E.१/२९

कार्यकारी अभियंता
(रोहयो) दक्षता पथक
आयुक्त कार्यालय
नागपूर.